माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२५/२०२२**

**अपिलार्थी, श्री. चेतन गणपती जयपुरकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,**
राजुरा, ता. राजुरा जि. चंद्रपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,**
राजुरा, ता. राजुरा जि. चंद्रपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०२.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०८.२०२१ | निरंक | २८.०९.२०२१ | २२.१०.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २४.०८.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " जानेवारी २०२० ते ऑगस्ट २०२१ या कालावधीत वनपरिक्षेत्र राजुरा येथील वनक्षेत्रा सभोवताल बांधण्यात आलेल्या सिमारेषा स्तंभ याची अंदाजपत्रक व लागलेलया मंजूर यांच्या केलेले पगार व हजेरी बुक त्याची सत्यप्रती व लागलेले साहित्य गिट्टी, वाळू, विटा, सिमेंट, खरेदी केले त्याची बिले याच्या सत्यप्रती देण्यात यावा " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २८.०९.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “माहिती मिळाली नाही ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१.१०.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २२.१०.२०२१ अन्वये, वनपरिक्षेत्र अधिकारी तथा जन माहिती अधिकारी राजुरा यांनी ७ दिवसाचे आत अपिलार्थीस संबंधित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावे, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १०.०१.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविण्यात आली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १७.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १३.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, राजुरा, श्री. एस.डी. येलकेवाड व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, राजुरा, श्री. एस.आर. लंगडे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक २४.०८.२०२१ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती ही शासकीय योजना, त्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी व त्याचा विनियोग या संबंधातील असून ही माहिती खर तर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४(१) अन्वये स्वंयप्रेरणेने उघड करणे अपेक्षित आहे. याबाबतीत नुकतेच **मा. सर्वोच्च न्यायालयाने Kishan Chand Jain Vs. Union Of India मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, या प्रकरणात दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी पारीत केलेल्या आदेशात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत सुचित करण्यात आले आहे.**

तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२.१०.२०२१ रोजीच्या आदेशात माहिती देण्याचे निर्देश दिल्यानंतरही अपिलार्थीस अडीच वर्ष होऊनही माहिती अप्राप्त असल्याची बाब ही अतिशय गंभीर आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कलम ७(१) चा भंग होत आहे. त्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री. व्हि. डी. गलगट यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये? याचा स्वंयस्पष्ट लेखी खुलासा त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत आयोगास सादर करावा. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. व्हि. डी. गलगट यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी. सदर खुलासा सादर करण्याची अंतिम संधी कलम २०(१) नुसार नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन देण्यात येत आहे. उपरोक्त खुलासा सादर न केल्यास एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२.१०.२०२१ रोजीच्या



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन अपिलार्थीस विनामुल्य माहिती पुरविण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

**अंतरिम आदेश**

उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री. व्हि. डी. गलगट यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट खुलासा सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याची पोहच आयोगास सादर करावी.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १३.०२.२०२४

जावक क्रमांक 5146 दिनांक 16 AUG 2024